IMPACT FACTOR
6.30

ISSN 2347-6834

International Registered & Recognized Research
Journal Related to Higher Education for All Subjects

# INDO GLOBAL RESEARCHERS

INDO ASIAN PUBLICATION

UGC APPROVED, REFEREED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

Issue : XX, Vol. III

Year- X, Bi-Annual (Half Yearly)

(May 2023 To Oct. 2023)

Editorial Office :
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

Website

www.irasg.com

Contact : - 02382 - 241913
09423346913 / 09637935252
09503814000 / 07276301000

E-mail :
visiongroup1994@gmail.com
interlinkresearch@rediffmail.com
mbkamble2010@gmail.com

Published by :
Indo Asian Publication,
Latur, Dist. Latur - 413531 (M.S.)India

Price : ₹ 200/-

EDITOR IN CHIEF

Dr. Nilam Chhangani
Head, Dept. of Economics,
S. K. N. G. Mahavidyalaya,
Karanja Lad, Dist. Washim(M.S.) India

EXECUTIVE EDITORS

Dr. Sachin Napte
Dept. of Mahagement
Indira Business School,
Pune, Dist. Pune (M.S.)

Dr. Balaji G. Kamble
Professor,Head, Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya,
Latur, Dist. Latur (M.S.)

DEPUTY EDITOR

Dr. Dileep S. Arjune
Head, Dept. of Economics,
J. E. S. College,
Jalna, Dist. Jalna (M. S.)

Dr. Allabaksh H. Jamadar
Chairman, BOS, Hindi,
S.R.T.M.University,
Nanded, Dist. Nanded (M.S.)

CO - EDITOR

Dr. Arun R. Kumbhar
Head, Dept. of Economics,
Arts & Comm. College,
Nesri, Dist. Kolhapur (M.S.)

Dr. Eknath J. Helge
Head, Dept. of Commerce,
Jijamata Mahavidyalaya,
Buldhana, Dist. Buldhana (M. S.)

MEMBER OF EDITORIAL BOARD

Dr. Mohmmad T. Rahaman
Dept. of Biomedical Science,
International Islamic University,
Mahkota (Malasiya)

Dr. Sivvappa Rasapali
Dept. of Chemistry,
UMASS, Dartmouth,
MA (United States)

Dr.Satyenkumar P. Sitapara
Principal
Commerce & BBA College,
Amreli, Dist. Amreli (Gujrat)

P. M. Band
Dept. of Dept. of Chemistry,
College of Eng. & Technology,
Babhulgaon, Dist. Akola (M. S.)

Dr. Arun Farfat
Head, Dept. of History,
Shri. S.G. M. College,
Borgaon Manju, Dist. Akola(M.S.)

Dr. Suresh Dhake
Head, Dept. of Economics,
S.N.D.T. College,
Dongar katore, Dist. Jalgaon (M.S.)

Dr. Dilip R. Jagtap
Dept. of Economics,
G. T. Patil College,
Nandurbar, Dist. Nandurbar(M.S.)

Dr. Nana Wankhede
Dept. of History,
Shivaji College,
Akola, Dist. Akola ( M.S. )

Dr. O. V. Shahapurkar
Head, Dept. of Geography,
Rajarshi Shahu College,
Latur, Dist. Latur (M.S.)

Arun U. Patil
Dept. of Economics,
Arts & Comm. College,
Akkalkuwa, Dist. Nandurbar (M.S.)

IMPACT FACTOR
6.30
ISSN 2347-6834
Indo Global Researchers (IGR)
Issue : XX, Vol. III
May 2023 To Oct. 2023
www.irasg.com

Research Paper 8 History

# राजे मुराररराव घोरपडे यांच्या कार्याचा अभ्यास

**गोपाळ मधुकर राठोड**
संशोधक विध्यार्थी
एम ए इतिहास सेट

**डॉ. नितीन उल्हासराव सराफ**
सहयोगी प्राध्यापक, संशोधक मार्गदर्शक
श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय,
अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती

अनेक इतिहासकारांनी भारतीय इतिहासातील अठरावे शतक मराठ्यांच्या इतिहासाचे असल्याचे नमूद केले आहे. स्वधर्मावरील वारंवार पडणारा घाला, स्वजनांची होणारी मानहानी, दिनदुबळ्यांची होणारी पिळवणुक पाहून अस्वस्थ झालेल्या शिवरायांनी स्वराज्य स्थापनेचा निश्चय करुन आपल्या अंगी असलेल्या लोकोत्तर गुणांच्या बळावर महाराष्ट्रात स्वराज्याची स्थापणा केली. मराठी मातीतून त्यांनी नवी मराठी माणसे उभी केली कारण या शतकातच मराठयांचे उत्तर आणि दक्षिण भारतात प्रबळ सत्तास्थान मराठयांनी आपल्या पराक्रमाने निर्माण केले होते. मराठ्यांच्या इतिहासात जे थोर सेनानी होऊन गेले, त्यात राजे मुराररराव घोरपडे यांचा उल्लेख आवर्जून करावा लागेल. राजे मुराररावांनी इ.स. १७३७ पासून इ.स. १७७७ पर्यंत सुमारे चाळीस वर्षे दक्षिण भारतात कर्तबगारी गाजवली. १७ या काळात मुराररावांचा इंग्रज, फ्रेंच, निजाम, पेशवे, हैदर आणि कर्नाटकातील नवाब यांच्याशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संबंध आलेला आहे. या काळात कर्नाटकातील कोणत्याही राजकीय-लप्परी हालचाली मुराररावांना वगळून क्वचितच झाल्या असतील, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. राजे मुराररराव घोरपडे यांच्या कर्तृत्वाचे मूल्यमापन अनेक इतिहासकारांनी केले आहे. त्यांच्यातील युद्धकौशल्य, संघटनचातुर्य, मुत्सद्देगिरी, समयसूचकता, शौर्य अशा अनेक गुणांची प्रशंसा अनेक इतिहासकारांनी मुक्तकंठाने केलेली आढळून येते.

मराठयांच्या इतिहासात घोरपडे घराण्याची कामगिरी अत्यंत महत्त्वाची आहे दक्षिण भारतातील 'गुत्तीचे राजे मुराररराव घोरपडे' यांनी आपल्या कर्तृत्वाने आणि त्याच्या चातुर्याने फ्रेंच, इंग्रज यांच्याशी उत्तम संबंध ठेवले होते. परंतू ज्यावेळी इंग्रज व फ्रेंच किंवा इतर सत्ता मुराररावांच्या किंवा मराठ्यांच्या हिताच्या आड येत असत त्यावेळी त्यांना मुराररराव आपल्या अजोड पराक्रमाने उत्तर देत असत.

कर्नाटकच्या राजकारणातील एक महत्वपूर्ण असामान्य व्यक्ती पराक्रमी योद्धा म्हणून राजे मुराररराव घोरपडे होते. त्यांची कर्नाटकच्या राजकारणातील महत्त्वाची भूमिका केली. त्यांच्या शौर्याची माहीती सर्वत्र

Issue: XX, Vol. III IGR IMPACT FACTOR 6.30 ISSN 2347-6834 May 2023 To Oct. 2023

# INDEX


| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | The Influence of Early Blight Disease on Biochemical Changes in Different Tamato Varieties<br>**Balwant Wamanrao Somwamshi** | 1 |
| 2 | A Study on Impact of Indian Economy on Industrial Development<br>**Dr. Bhagwat Arjun Bhanudas** | 7 |
| 3 | Existential philosophy and Arun Joshi<br>**Manojkumar S. Mane, Dr. S.V. Gaikwad** | 13 |
| 4 | A Theoretical Critique of J.K. Rowling's Harry Potter Series<br>**Sarfaraj Osman Sayyad** | 18 |
| 5 | Trends in Forms of Family<br>**Dr. Haji Begum** | 29 |
| 6 | नारी अस्मिता की कहानीकार मैत्रेयी पुष्पा<br>**रविशंकर दगडू रोकडे** | 32 |
| 7 | स्त्री व पुरुष समानता रुजवण्यात माझी भूमिका<br>**सुनिता भाऊसाहेब इंगळे** | 36 |
| 8 | राजे मुरारराव घोरपडे यांच्या कार्याचा अभ्यास<br>**गोपाळ मधुकर राठोड, डॉ. नितीन उल्हासराव सराफ** | 39 |
| 9 | स्थानिक स्वराज्य संस्थेची वाटचाल<br>**डॉ. एस. एम. आकाशे** | 44 |
| 10 | २० व्या शतकातील महाराष्ट्र : सामाजिक, धार्मिक दृष्टीने अवलोकन<br>**डॉ. एस. एन. सातव** | 51 |
| 11 | वृद्ध महिलांच्या समस्येची कारणे व उपाययोजना<br>**बालाजी दासू राठोड** | 56 |

पसरू लागली. यामुळे दक्षिण भारतात राजे मुरारराव घोरपडे यांचा दबदबा होता. त्यामुळे दक्षिण भारतातील राजकारणात मुाररावांचे प्रस्थ वाढले होते. अशावेळी चंदासाहेबाने कर्नाटक ताब्यात घेण्याच्या उद्देशाने फ्रेंच सेनाधिकारी डुप्ले यांच्याशी हात मिळवणी केली. डुप्लेने चंदासाहेबास मराठ्यांच्या विरुध्द मदतीचे आश्वासन दिले. भारतीय राजकारणात हस्तक्षेप करण्याचा फ्रेंचांचा हा पहिलाच प्रसंग होता. या प्रसंगात डुप्लेचे दुटप्पी धोरण स्पष्ट दिसत होते. एकीकडे चंदासाहेबास मदतीचे आश्वासन तर दुसरीकडे मराठयांचा रोष ओढवेल या मर्यादेपर्यंत जायचे नाही, असे त्यांचे धोरण होते यावरुन मुाररावांच्या सामर्थ्याची कल्पना येते.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

१. राजे मुारराव घोरपडे यांच्या व्यक्तिमत्वाचा अभ्यास करणे.

२. मराठा साम्राज्य वाढविण्याच्या प्रक्रियेतील मुारराव घोरपडेचे योगदान अभ्यासणे.

३. मराठा राजकारणातील राजे मुारराव घोरपडे यांच्या प्रभावाचा अभ्यास करणे.

४. राजे मुारराव घोरपडे यांच्या रणसंग्रामाची वस्तुनिष्ठ चिकित्सा करणे.

५. राजे मुारराव घोरपडेंच्या लष्करी (युध्दकौशल्य) डावपेचांचा अभ्यास करणे.

६. राजे मुारराव घोरपडे व फ्रेंच, इंग्रज संबंधावर ऐतिहासिक दृष्टीकोणातून प्रकाश टाकने.

७. राजे मुारराव घोरपडे व हैदर अली यांच्या झालेला संघर्षमय टयुद्धाचा इतिहास अभ्याने

**राजे मुारराव यांचे कर्तुत्व :**

राजे मुारराव घोरपडे यांच्या बद्दल हैदरच्या मनात आत्यंतिक तीन राग होता. त्याने त्याचा पुरेपूर बदला घेतला. हत्तीला जसे बांधतात तथा जाडसर साखळदंडाने बांधून मुाररावांची श्रीरंगपट्टण मधून धिंड काढण्यात आली. कपालदुर्गच्या अंधार कोठडीत मुाररावांना आणि शंभर-दोनशे मराठ्यांना डांबण्यात आले. दहा-बारा दिवस रोज मुाररावांवर अनन्वित अत्याचार केले गेले. अन्न तर सोडाच धड प्यायला पाणीही देण्यात आले नाही. उपासमारीने आणि अत्याचारांनी मुाररावांची प्रकृती खूपच खालावली, त्यातच त्यांचा मृत्यू झाला. शिवाय इतर मराठ्यांची कत्तल करण्यात आली.

पुरंदरवर राजे मुारराव कैदेत सापडल्याची बातमी मिळेपर्यंत हैदर अलीने मुाररावांची हत्या केली होती. पेशव्यांचे कारभारी इंग्रजांबरोबर महत्त्वाच्या तहाची चर्चा करण्यात अडकून पडले होते. शिवाय राघोबादादांच्या कारवायांना आळा घालण्यासाठी सल्लामसलत करण्यात व्यस्त होते. ही सगळी पेशव्यांची गादी वाचवण्यासाठी चाललेली कारभात्यांची धडपड, त्यात मुारराव घोरपडे यांच्यासारखा शूर सेनानी तिकडे गुत्तीच्या किल्ल्यावर पडला काय? किंवा जिंकला काय? यांना इकडे त्याचे काहीही सोयरसुतक नव्हते. यावरून पेशव्यांच्या राजकारणाचा मुारराव घोरपडे बळी गेलेला दिसतो.

आपल्या कोणत्याही शत्रूंना उरून पुरणारे शरीरात जीव असेपर्यंत शत्रूच्या हाती मराठ्यांचे गुत्तीचे राज्य पडू नये म्हणून झुंजणारे राजे मुारराव घोरपडे हे मराठा साम्राज्याचे अखेरचे सेनापती. त्यांनी हैदरला दिलेली एकाकी झुंज ही मराठ्यांच्या इतिहासातील एक अतुलनीय शौर्य गाथा आहे. पेशव्यांची आपापसातील दुफळी, फंदफितुरी आणि कारभाऱ्यांची चुकीची धोरणे मुाररावाच्या अस्ताला कारणीभूत ठरली. हीच काय तर ती मराठा साम्राज्याची शोकांतिका ठरली आहे. राजे मुारराव घोरपडे यांचे निधन म्हणजेच मराठ्यांचे दक्षिणेतील फार मोठे कर्तृत्वस्थान

संपले. शिवाय मराठ्यांचे दक्षिणेतील नेतृत्व नाहीसे झाले, यात शंकाच नाही.

राजे मुरारराव घोरपडे हा दक्षिणेतील एक मातब्बर प्रभावी सरदार असल्याने दक्षिणेत मराठा राज्यविस्तार करण्याच्या दृष्टीने बाजीराव पेशव्याने सुद्धा मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले होते. त्यासंबंधी रियासतकार गो. स. सरदेसाई यांनी म्हटले आहे. तत्पूर्वी शाहू महाराजांकडून मुराररावांना हिंदुराव हा किताब दिला होता.

राजे मुरारराव घोरपडे यांच्या कर्तृत्वाचे मूल्यमापन अनेक इतिहासकारांनी केले आहे. त्यांच्यातील युद्धकौशल्य, संघटनचातुर्य, मुत्सद्देगिरी, समयसूचकता, शौर्य अशा अनेक गुणांची प्रशंसा अनेक इतिहासकारांनी मुक्तकंठाने केलेली आढळून येते. "इ.स. १७४० मध्ये कर्नाटकात कर्नाटकची स्वारी रघुजी भोसलेच्या नेतृत्त्वाखाली हाती घेण्यात आली. त्या स्वारीत प्रतिनिधी, पेशवा, फत्तेसिंग भोसले, अक्कलकोटकर व इतर मराठा सरदार सामील झाले. मुरारराव घोरपडे कर्नाटकातील राजकारणासंबंधी माहिती असणारा यांनाही या स्वारीत सामील करून घेण्याचे पेशव्यांनी ठरविले त्याप्रमाणे शाहूने मुराररावांना पत्र लिहिलेले दिसते, पहिल्यांदाच संताजी घोरपडेच्या निधनानंतर मुरारराव या मोहिमेत सामील झाला असे मराठ्यांचा इतिहासकार ग्रँट डफ नमूद करतो. त्यावेळी मुराररावाने शाहूकडून आपणास सेनापतीपद व तुंगभद्रेजवळचा प्रदेश आपणास मिळावा अशी विनंती केलेली दिसते. ह्या स्वारीत मुरारराव घोरपडेंनी भाग घेतलेला दिसतो.

थोरल्या बाजीरावाच्या मृत्यूनंतर ( इ.स. १७४०) बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब यांच्याकडे पेशवे पद आले. सन १७४० च्या रघुजी भोसले यांच्या स्वारीपासून मुराररावांच्या मृत्यूपर्यंत मराठ्यांच्या कर्नाटकच्या प्रांतावर सात आठ मोठ्या स्वान्त्या झाल्या. पानिपतच्या पराभवानंतर स्वान्या काही काळ झाल्या नाहीत. नंतर माधवराव पेशव्यांनी कर्नाटकात स्वारी करताना राजे मुरारराव घोरपडे आपल्या सोबत रहावेत याची पूरेपूर खबरदारी घेतली. माधवरावांच्या मृत्यूनंतर कर्नाटकवर मराठी सत्तेवर आणि प्रतिष्ठेवर फार मोठा परिणाम झालेला दिसून येतो. थोरल्या माधवराव पेशव्यांच्या मृत्यूचा फायदा हैदरने घेण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. या सर्व अनुकूल-प्रतिकूल परिस्थितीत राजे मुरारराव मात्र खंबीरपणे उभे असल्याचे दिसून येते.

राजे मुरारराव इतिहासात "चीफ ऑफ गुत्ती" या नावाने विशेष उल्लेखले जातात. राजे मुराररावांना इंग्रज व फ्रेंच यांच्याकडून 'चीफ ऑफ गुत्ती ही पदवी मिळालेली होती. याकाळी राजे मुरारराव घोरपडे यांचे पाठबळ आपल्यालाच मिळावे यासाठी तत्कालीन सनांची चढाओढ चालू असायची, यावर एक इंग्रज इतिहासकार म्हणतो की, मुराररावांचे प्रस्थ एवढे वाढले होते की, दक्षिणेतील सत्ताधीशांच्या मनात त्यांची दहशत बसली होती. हैदर अली मात्र मुराररावांचा द्वेष करीत असे. इंग्रज, फ्रेंच सोबतच अर्काट, सावनूर, कडप्पा येथील नवाब मुराररावांना बचकून राहत असत. मुराररावांच्या बाबतीत विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे अत्यंत अडचणीच्या वेळेस सुद्धा त्यांनी कोणासमोरच शरणागती पत्कारली नाही. हैदरअलीने पकडल्यानंतर त्यांना मृत्यू समोर दिसत होता, तरीही मुरारराव स्वाभिमानाने वागले. त्यांचा हा स्वाभिमान आयुष्यभर असाच राहिला होता. त्यामुळेच ते सतत सुमारे चाळीस वर्ष एकापेक्षा एक वरचढ शत्रु बरोबर लढत राहिले. शिवाय दक्षिणेत आपले राज्य केवळ सुरक्षितच ठेवले नाही तर वाढविले सुद्धा हे सुराररावांचे कर्तृत्व तत्कालीन इतिहासाच्या चौकटीत अनन्यसाधारणच म्हणावे लागेल.

वासुदेव शास्त्री खरेंच्या शब्दात सांगायचे झाल्यास, मुरारराव हे मराठ्यांच्या शिपाईगिरीचा अत्यंत तेजस्वी तारा होय.

आर्म्स म्हणतो की, "मुराररावांनी इ.स. १७४३ मध्ये त्रिचनापल्ली निजामाच्या स्वाधीन केल्यावर गुत्ती येथे स्वतंत्र राज्य स्थापन केले. दक्षिणेतील मराठ्यांचे ते एकमेव स्वतंत्र राज्य होते." आर्म्स याला मुराररावांसंबंधी वैयक्तीक माहिती होती. कारण आर्म्स हा ईस्ट इंडिया कंपनीत इ.स. १७४३ मध्ये रुजू झाला होता. तो इ.स. १७५४ मध्ये मद्रास कौन्सिलचा सदस्य झाला तो इ.स. १७५८ पर्यंत पदावर होता. मुराररावांच्या कारकीर्दीची सुरवात आणि आमचे ईस्ट इंडिया कंपनीत येणे दोघांचा काळ जवळपास सारखाच आहे. शिवाय इ.स १७५४ ते इ.स. १७६० च्या दरम्यान त्या दोघांची भेट ही झाली होती.

आर्म्सने आपल्या 'हिस्ट्री ऑफ हिंदोस्तान' खंड पहिला या ग्रंथात मुरारराव घोरपडे यांच्या लष्करी शिस्तीबद्दल कौतुक केले आहे तो म्हणतो, "मुराररावांच्या शंभर घोडेस्वारांचा एकही अधिकारी असा नव्हता की जो सर्व लष्कराचे सेनापतीपद करू शकत नसे. पण एवढे मोठे कर्तुत्व अंगी असूनही आपल्याला जे स्थान मिळाले आहे ते समाधानी मनाने आणि निलेने सांभाळण्यात तो आपले कर्तव्य मानीत असे. त्यांचे अधिकारी एकमेकांशी अत्यंत आपलेपणाने वागत असत आणि आपल्या प्रमुखाची आज्ञा पालन करण्यात ते यत्किंचितही कसूर करीत नसत. अशा विविध गुणांमुळे मुराररावांचे सैन्य भारतात त्याकाळी असलेल्या इतर कोणत्याही देशी सैन्यापेक्षा निश्चितच उत्कृष्ट होते. मराठी माणसात जे गुण असतात ते सर्व गुण तर मुराररावांच्या सैनिकात होतेच, उदा. चपलता, शिस्त, घोड्यांची निगा राखण्यात आणि त्यांचा उत्तम उपयोग करण्यात आपुलकी इत्यादी पण या सर्व गुणांशिवाय मुराररावाच्या सैन्यात आणखी काही गुण होते. युरोपियनांशी लढण्याचे प्रसंग आल्यामुळे मुराररावांच्या सैन्याने बंदुका व तोफा चालवण्याचे अद्वितीय कसब आत्मसात केले होते."

या वरील आर्म्सच्या तपशिलावरून राजे मुरारराव घोरपडे यांच्या संघटन कौशल्याचे दर्शन होते.

## सारांश

राजकारणपटावर नेमक्या वेळी नेमकी कोणती सोंगटी सरकवायची, कोणती नक्की करायची याचे महाराणीला अचुक ज्ञान होते. अत्यंत कठीण समई राजे मुरारराव यांनी गाजविलेल्या पराक्रमाला इतिहासात तोड नाही. राजे मुरारराव यांनी आपल्या शौर्याच्या जोरावर आणि चातुर्याने दक्षिणेच्या राजकारणात आपले वर्चस्व प्रस्थापित करतांना आपल्या धोरणात लवचिकता देवळी. अनेक वेळा राजे मुरारराव यांनी शत्रु व मित्रांच्या बाबतीत आपल्या भूमिकेत बदल केल्याचे दिसून येते. यामागे त्यांचा दृष्टिकोन केवळ मराठ्यांच्या दक्षिणेतील हितसंबंधांना धक्का लागू नये हाच होता. मुराररावांचा स्वभाव हा स्वाभिमानी होता. त्यांनी कोणत्याही लोभाची परवा न करता आयुष्यभर आपला स्वाभिमान जपल्याचे दिसून येते. त्यांच्यातील या विविध गुणांमुळेच आहे.

## संदर्भ सूची :-


१. आपटे,द.वि.,रा.वा. ओतुरकर, (संपा.), १९४१, साधन परिचय अर्थात महाराष्ट्राचा पत्ररुप इतिहास, अ.वि.ग्रह प्रकाशन पुणे.

२. केळकर, य.न.,नॉव्हेंबर २००६, ऐतिहासिक शब्दकोश, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे - ३०

३. अप्पासाहेब पवार, (संपा.), २०१२, ताराबाईकालीन कागदपत्रे, खंड दुसरा,

कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ०४

४. पवार,अप्पासाहेब, (संपा.), २०१२, ताराबाईकालीन कागदपत्रे, खंड तिसरा, कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर -०४

५. श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ, (सं.पा.) ऑगस्ट २००९, शिवकालीन पत्रसार, संग्रह, खंड पहिला, टिळक स्मारक मंदिर, पुणे - ३०

६. कुळकर्णी, अ.रा., ग.ह. खरे, (संपा.), १९८६, मराठयांचा इतिहास खंड तिसरा, कॉन्टिनेंटल प्रकाशन, विजयनगर, पुणे - ३०

७. कुळकर्णी, अ.रा., डिसेंबर २००४, कंपनी सरकार (ईस्ट इंडिया कंपनी), राजहंस प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे - ३०

८. गर्गे, स.मा., रा.ह.वर्टिकर, (संपा.) नोव्हेंबर १९७४, कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याचा इतिहास, सदाशिव मार्तंड गर्गे, ज्ञानेश १२०५/४, शिवाजी नगर, पुणे

९. गर्गे, स.मा., ऑक्टोंबर २००२, करवीर रियासत, श्री शाहू छत्रपती महाराज, न्यू कोल्हापूर. पॅलेस,

१०. गर्गे, स.मा.,(संपा.) २०१२, मराठी रियासत, गोविंद सखाराम सरदेसाई, खंड तिसरा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई - २६.